कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/गु.पो.सं.मे/२०२३–२४/५८९
दि. २६/०६/२०२३

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी गोवा व इस्टीटयुट मिनेझीस ब्रागांझा यांच्या संयुक्त विद्यमाने कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून दि. ३ जुलै २०२३ रोजी दुपारी ठिक २.३० वाजल्यापासून हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातील विद्यार्थांचा शास्त्रीय गायन, वादन व नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तसेच दि. ४ जुलै २०२३ रोजी स. ठिक १०.०० वाजल्यापासून कला अकादमीच्या पेडणे, साखळी, वाळपई, सांगे, केपे व काणकोण या संगीत केंद्रातील विद्यार्थांचा “संगीत मेळावा” हा गायन वादनाचा कार्यक्रम होणार आहे. दि. ३ जुलै रोजी दुपारी ठिक २.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार आहे. हा कार्यक्रम इस्टीटयुट मिनेझीस ब्रागांझाच्या छोटया सभागृहात संपन्न होणार आहे.

उद्‌घाटनानंतर शास्त्रीय सहगायनाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. त्यामध्ये श्री. रुपेश गावस, श्री. सचिन तेली व सौ. सम्राज्ञी आईर यांचे शिष्य कु. अवी परवार, कु. मुक्ता मिसर, कु. श्रृती नाईक, कु. उगम सावंत, कु. सत्यनारायण कळंगुटकर व कु. राजमी फळदेसाई या विद्यार्थ्यांचा “सुरन गावो सरस” हा शास्त्रीय सहगायनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर श्री. नंदा कळंगुटकर यांचे शिष्य कु. आरव सुर्लकर यांचे संवादिनी वादन होणार आहे. संवादिनी वादनानंतर श्री. प्रेमानंद आमोणकर यांचे शिष्य कु. आकाश नाईक व कु. यतिन कुंकळकर यांचे तबला सहवादन होणार आहे. त्यानंतर श्री. रोहित वनकर यांची शिष्या कु. रिया चोयिकंदी हिचे बासरी वादन होईल. बासरीवादनानंतर सौ. सिमा शिकेरकर यांच्या शिष्या कथ्थक नृत्य सादर करणार आहेत त्यामध्ये कु. वरदा चव्हाण, कु. प्रेरणा प्रभु, कु. अनुश्री प्रभु चांदेलकर, कु. प्रथा नाईक व कु. आरुषी प्रभु या विध्यार्थीनी आपल्या नृत्यामधून शिवस्तुती व कृष्णभजन सादर करतील. त्यानंतर कार्यक्रमाची सांगता डॉ. सपना नाईक यांच्या शिष्यांच्या भरतनाटयम नृत्याने होणार आहे. त्यामध्ये मराठी अभंगांच्या आधारावर “सखा पांडुरंग” हा कार्यक्रम सादर करतील त्यामध्ये कु. आकृती ताम्हणकर, कु. गौरी शानबाग कु. ॲना मारिया के. व कु. अमिषा अडकोणकर या विद्यार्थीनी भाग घेतील. सदर कार्यक्रमासाठी श्री. सुरज मोरजकर, श्री भार्गवराम गर्दे व प्रज्योत ताम्हणकर यांची तबलासाथ

तसेच श्री. चारुदत्त गांवस व श्री. शुभम नाईक यांची संवादिनीची साथ लाभणार आहे. भरतनाटयम नृत्यासाठी डॉ. सपना नाईक यांची नटवंगम साथ व कु. तृप्ती दळवी या गायन साथ करणार आहेत. सौ. मंदिरा तिरोडकर व सौ वरदा बेडेकर या संपूर्ण कार्यक्रमाच्या निवेदनाची बाजू साभाळणार आहेत.

दुस-या दिवशी दि. ४ जुलै २०२३ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजल्यापासून कला अकादमीच्या सर्व संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा गायन-वादनाचा कार्यक्रम इस्टीटयुट मिनेझीस ब्रागांझाच्या छोटया सभागृहात संपन्न होणार आहे. तरी सर्व रसिक श्रोत्यांनी या दोन्ही दिवसाच्या संगीत कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, सदर कार्यक्रम हा सर्वांसाठी खुला आहे. तरी आपण सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थिती लावावी असे कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यात येत आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७. गोवनवार्ता ८. आकाशवाणी पणजी केंद्र (वृत्तविभाग) ९. दै.भांगरभूंय

एसएस